झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१. फॅक्स:९१-२२-२६५९०४५७
दूरध्वनी: ०२२-२६५९०५१९/०४०५/१८७९/०९९३
Email: info@sra.gov.in

जा.क्र.मुंबई/मुकाअ/परिपत्रक/१२३३सन २००५
दिनांक : १२/५/२००५

परिपत्रक ७२

**विषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतंर्गत सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या नोंदणीबाबत.**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.२० दि.18/09/1998 नुसार नियोजित झोपडपट्टी पुर्नवसन योजनेस "बांधकाम परवानगी" (Commencement Certificate) प्राप्त झालेवर झोपडीधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला "नोंदणी प्रमाणपत्र" (Registration Certificate) देण्यात येते. उपरोक्त परिपत्रकाच्या निकषात अंशता बदल करून खालील सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

अ) झोपडपट्टीधारकांच्या नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्था/संघीय सहकारी गृहनिर्माण संस्थेचे "नाव आरक्षण (Name Reservation) व बँकेत खाते उघडण्या" (Opening of Bank Account) संबंधित परवानगी "सक्षम अधिकारी" यांनी "परिशिष्ट-२" निर्गमित केल्यावर देणे यापुढे आवश्यक असेल.

ब) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस "आशयपत्र" (Letter of Intent) देण्यापूर्वी कार्यकारी अभियंता हे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, यांनी झोपडपट्टीधारकाच्या नियोजित संस्थेस नाव आरक्षणाची परवानगी दिलेली आहे याची खात्री करून "आशयपत्र" (Letter of Intent) देण्याबाबत प्रस्तावावर पुढिल कार्यवाही करतील.

क) झोपडपट्टीधारकाच्या सहकारी गृहनिर्माण संस्था/संघीय सहकारी गृहनिर्माण संस्थेस "आशयपत्र" (Letter of Intent) प्राप्त झालेवर सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, हे सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी ठरवून दिलेल्या निकषानुसार "महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम" १९६० चे "कलम ९" अन्वये सहकारी गृहनिर्माण संस्थेची किंवा "कलम ६(३)" नुसार संघीय संस्थेची नोंदणी करतील. कार्यकारी अभियंता हे "आराखडे मंजूरी" चा (Intimation of Approval) प्रस्तावासोबत संस्थेचे "नोंदणी प्रमाणपत्र" (Registration Certificate) प्राप्त झालेले आहे याची खात्री करून घेतल्यावरच आराखडे मंजूरीचा (Intimation of Approval) प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करतील.

उपरोक्त परिपत्रकामधील सुधारील आदेश दिनांक १.७.२००५ पासून अमलात येतील.

दे. चक्रवर्ती.
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण